# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 15.12.2012 (दिनांक 29.11.2012 (का.प.क्र.19) ची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 15.12.2012 (का.प.क्र. 19) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप

**विषय क्र. 97 :** (विषय क्र. 89 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 12/11/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय स्थगीत करण्यांत येतो.**

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 98 :** (विषय क्र. 90 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 12/11/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय स्थगीत करण्यांत येतो.**

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 99 :**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) उपविधी-2009 चा मसुदा यासंबंधीचे मा.सर्वसाधारण सभा

दि.17/07/2010 विषय क्र.28 चे मंजुर ठरावासह शासन मान्यतेस्तव दि.29/09/2010 रोजी सादर केला आहे. शासन मान्यता व्हावयाची आहे. शासन मान्यतेनंतर सदर राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल.

दरम्यान सदरील फेरीवाला धोरण अंमलबजावणी संबंधाने प्रत्यक्ष कार्यवाही करीता अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG) यांनी अहमदाबाद महानगरपालिकेमध्ये काम केले आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका करीता प्रस्ताव सादर करून या कार्यवाही अंतर्गत प्रामुख्याने,

1. शहर फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती, फेरीवाला व्यवस्थापन समिती इत्यादी गठीत करणे,
2. फेरीवाल्याची नोंदणी करणे,
3. फेरीवाला व्यवसाय क्षेत्र नियोजन करणे,
4. फेरीवाला जागा वाटप करणे.

या टप्प्यावर कार्यवाही/कृती होणे अपेक्षित असल्याने त्यासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण करून डेटाबेस उपलब्ध करून बायोमॅट्रिक सर्वे/ फोटो सेन्सेसद्वारे सर्व प्रकारच्या फेरीवाल्याची माहिती घेणे इत्यादी (आयडेंटीफिकेशन ऑफ ऑल टाईपस् ऑफ वेंडर) करून धोरण अंमलबजावणी संबंधाने कार्यवाही करण्यात येईल. या प्रत्यक्ष सर्वेक्षणाकरीता अपेक्षित असलेला खर्च तुर्तास महानगरपालिकेने न देता तो खर्च महानगरपालिकेने मान्यता/ परवानगी दिल्यानंतर सर्वेक्षण/ अर्ज विक्री/ परवाना देणे यावेळी संबंधीत फेरीवालाकडून घेण्यात येऊन त्या जमा रक्कमेतून भागविण्यात येईल, त्यातून तो खर्च पुरविण्यात येईल. महानगरपालिकेने खालीलप्रमाणे परवाना शुल्क आकारणेस परवानगी/ मान्यता दिल्यास त्यातून जमा होणारे शुल्कातून संस्थेस या संबंधीच्या साफ्टवेअर, तांत्रिक पाठबळ व यंत्रणा सेटअप करून देण्याचा खर्च म्हणुन द्यावयाची रक्कम रू.7.50 लक्ष व प्रति फेरीवाला करीताचा सर्वेक्षण खर्च रू.135/- इत्यादी वजा करून महानगरपालिकेस उत्पन्न म्हणुन उर्वरित रक्कम मिळणार आहे. त्यासंबंधाने -

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | 8000 फेरीवाले अपेक्षित | रू.300/- प्रतिवर्ष परवाना शुल्क घेतल्यास | वरीलप्रमाणे खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रू.5,70,000/- उत्पन्न मिळू शकेल. |
| ब) | 8000 फेरीवाले अपेक्षित | रू.500/- प्रतिवर्ष परवाना शुल्क घेतल्यास | वरीलप्रमाणे खर्च वजा जाता उर्वरित रक्कम रू.21,70,000/- उत्पन्न मिळू शकेल. |

करीता शहरातील फेरीवालाकडून राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने वर नमूद केलेल्या सर्वेक्षणाकरीता शुल्क आकारणी संबंधाने दरास व सर्वेक्षण करून डेटाबेस तयार करण्याचे कार्यवाहीस मान्यता व्हावी. यामध्ये महानगरपालिकेने आता काही रक्कम / तरतूद केलेली नसली व तुर्तास संस्थेस रक्कम दिली नाही. तरी संस्था सर्व कार्यवाही करून डेटाबेस व तांत्रिक पाठबळ या कार्यवाहीचे सॉफ्टवेअर, त्याबाबतचा सर्व सेटअप करून देण्याची कार्यवाही करून देणार आहे व त्याआधारे परवाना देणे व यापुढील कालावधी करीता प्रतिवर्ष परवाना शुल्क घेतल्यास तेवढे महानगरपालिकेस नियमित उत्पन्न मिळेल व शहरवासीयांसह, फेरीवाला करीता सुव्यवस्थित/ नियोजीत कार्यवाही होऊन फेरीवाला समस्या निवारणाची कार्यवाही होईल. दरम्यानच्या काळात शासनाकडे सादर उपविधी मंजूरीसाठी पत्र देऊन शासन मान्यतेनंतर उक्त उपविधीचा अंमल करणे असल्याने त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद :</u>

श्री.नारायण कुचे :औरंगाबाद महापालिकेच्या क्षेत्रासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणीसाठी स्थायी समितीकडे विषय आलेला आहे. हॉकर्स झोन घोषित आहे का? शासन निर्णयानुसार फेरीवाल्यांना कोणत्या सुविधा देणार आहे. शासन घोषित शासन मान्य एजन्सीला काम देणार आहे का? शहरातील कोणकोणता भाग हॉकर्स झोन म्हणून घोषित झालेला आहे? माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने माहिती द्यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :अहमदाबाद फेरीवाला एजन्सी ही शहर फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती, फेरीवाला व्यवस्थापन समिती इत्यादी

गठीत करू शकतात का? महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉकर्स झोन घोषित नाही. कुठलीही पुर्व तयारी नाही.

मालमत्ता अधिकारी :राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणीसाठी शासनाच्या निर्देशानुसार सर्वेक्षण करणे, फेरीवाल्यांची माहिती घेणे, फेरीवाला धोरण अंमलबजावणीसाठी भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अहमदाबाद येथे काम केलेले आहे. त्यांनी तसा प्रस्ताव दिलेला आहे. हॉकर्स झोन घोषित केलेला नाही. सर्वेक्षण करून डाटाबेस तयार करून वर्गवारी तयार करून त्या प्रमाणे हॉकर्स झोन तयार करण्यात येईल. तसेच शासन निर्णयानुसार फेरीवाल्यांना सुविधा देण्यात येणार आहे. हॉकर्स संघटनांना सामिल करून निर्णय घेण्यात येणार आहे. महानगरपालिकेने काम दिलेले आहे त्यांचेकडून काम करून घ्यावयाचे आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण करून डेटाबेस उपलब्ध करून बायेमॅट्रिक सर्वे/फाटा सेन्ससद्वारे सर्व प्रकारच्य फेरीवाल्याची माहिती घेणे इ. करुन धोरण अंमलबजावणी संबंधाने कार्यवाही करणे.

श्री.गिरजाराम हाळनोर : शहर फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती, फेरीवाला व्यवस्थापन समिती इत्यादी गठीत करू शकतात का? हा अधिकार त्यांना आहे का ?

मालमत्ता अधिकारी :या कार्यवाही अंतर्गत ही कामे करावयाची आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरणमधील जी कार्यवाही आहे ती टप्प्याटप्याने करावयाची आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :शासनाचे असे निर्देश आहे म्हणुन प्रस्तावात तसे नमुद करायला पाहिजे होते. समित्या गठीत करण्यासंदर्भात मदत करणार आहे असे नमुद करायला पाहिजे होते. 300 ते 500 असे दर प्रस्तावात दिलेले आहे. पुर्वी शहरातील हातगाडीवाल्यांकडुन पैसे गोळा केलेले आहेत. त्यांना बॅचेस् दिलेले आहे. त्याचे काय झाले?

मालमत्ता अधिकारी :फेरीवाल्यांची शहरात संख्या वाढलेली आहे. आता अद्यावयत डाटा तयार करावा लागणार आहे.

मा.सभापती :हॉकर्स झोन कुठे असला पाहिजे कुठे नाही याबाबत माहिती घेणार आहे शहरात किती फेरीवाले आहे त्यांची माहिती घेण्यात येणार आहे.

मालमत्ता अधिकारी :यासंबधीचे नियोजन करण्यात येणार आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर :पुर्वी फेरीवाल्यांकडुन घेतलेल्या रक्कम व बॅचेस् बाबत प्रशासनाचे काय धोरण आहे स्पष्ट करण्यात यावे.

श्री.नारायण कुचे :फेरीवाल्यांची नोंदणी एजन्सी करणा आहे का?

मालमत्ता अधिकारी :नोंदणी एजन्सी करणार आहे.

मा.सभापती : एजन्सी अहवाल देईल त्यानंतर प्रशासनाला/स.सदस्यांनी त्यावर निर्णय घ्यायचा आहे. स.सदस्यांनी जे मुद्दे/प्रश्न उपस्थित केलेले आहे त्याबाबतीत प्रशासनाने संपुर्ण माहिती देवुन स.सदस्यांचे निरासन करून, पुढील बैठकीत विषय ठेवण्यात यावा.

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव संपुर्ण माहितीसह पुढील बैठकीत ठेवावा, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.**

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद